**प्रेस नोट** दि. ०५/१०/२०२३

## सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग, ठाणे येथील कनिष्ठ लिपीक, यास लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांनी घेतले ताब्यात

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | ठाणे |
|---|---|
| स्टेशन डायरी नोंद क्र. | ठाणे नगर पोलीस ठाणे, ठाणे शहर दि. ०५/१०/२०२३ रोजीची पोलीस ठाणे दैनंदिन नोंद क्रमांक ०३३/२०२३ वेळ ११:४० वा. |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | विशाल देविदास गोसावी, वय–३४ वर्षे, कनिष्ठ लिपीक, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग, ठाणे |
| मागितलेल्या लाचेची रक्कम | १०,०००/–रुपये |
| स्वीकारलेल्या लाचेची रक्कम | १०,०००/–रुपये |
| थोडक्यात हकीकत | यातील तक्रारदार शासकीय कंत्राटदार असून त्यांना मिळालेल्या कंत्राटाच्या माध्यमातून त्यांनी केलेल्या कामाच्या बिलाची उर्वरित ५,७९,०००/– रुपये रकमेचे बिल प्रलंबित होते. सदरचे बिल काढून देण्या करीता सार्वजनिक बांधकाम विभागातील लिपीक गोसावी यांनी त्यांचे कार्यालयातील लेखा अधिकारी श्री अनिरुध्द यांचे करीता ५०००/– रु तसेच कार्यारंभ आदेश दिल्या बद्दल १००००/– रु असे एकूण १५,०००/– रुपये लाचेची मागणी केले असल्याबाबत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे येथे दि. ०४/१०/२०२३ रोजी तक्रार नोंदविली होती.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषगाने लागलीच दि. ०४/१०/२०२३ रोजी केलेल्या पडताळणी मध्ये लोकसेवक गोसावी यांनी तक्रारदार यांचे कडे १०,०००/–रु लाचेचे मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने आज दि. ०५/१०/२०२३ रोजी लाचेच्या मागणीच्या सापळ्याचे आयोजन करून लोकसेवक विशाल देविदास गोसावी याने तक्रारदार यांच्याकडुन १०,०००/– रु. लाच स्विकारली असताना त्याना त्यांचे सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग, ठाणे येथील कार्यालयात रंगेहाथ पकडण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी – मा. श्री सुनिल लोखंडे, सो. पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**
**मा. श्री अनिल घेरडीकर, सो. अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवका संबधी काही तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र ठाणे यांचेशी संपर्क साधावा.


संपर्क पत्ता :– ला.प्र.वि. ठाणे मध्यवर्ती कारागृहासमोर ठाणे पश्चिम ४००६०१
संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल :– spacbthane@mahapolice.gov.in
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net
टोल फ्रि नंबर :– १०६४
दुरध्वनी क्रमांक :– ०२२–२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉट्सॲप नं :– ९९३०९९७७००
दिनांक :– ०५/१०/२०२३


( राजेश जागडे )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे.